जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - १६९ दिनांक - १४/०३/२०२४

खंडणी विरोधी पथक १,गुन्हे शाखा,पुणे शहर

### ०२ वर्षापासून मोक्यातील पाहिजे असलेल्या आरोपीस केले जेरबंद

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर व मा.सह पोलीस आयुक्त पुणे शहर, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे,पुणे शहर यांनी पुणे शहर आयुक्तालयातील रेकॉर्डवरील पाहिजे,फरारी आरोपींचा शोध घेऊन कारवाई करणेचे आदेश दिलेले होते.

खंडणी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस अंमलदार राजेंद्र लांडगे यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, वारजे पोलीस ठाणे कडील मोक्क्याच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी सिद्राम उर्फ अभी रमेश मंजिली हा सोलापूर शहरात आपली ओळख लपवून राहत आहे. सदर बातमीची पडताळणी करून मा. वरिष्ठाचे परवानगीने सोलापूर बालाजी चौक या ठिकाणी सापळा रचून आरोपी **सिद्राम उर्फ अभी रमेश मंजिली, वय २४ वर्षे, रा डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे सध्या - रविवार पेठ, सोलापूर शहर** यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचे इतर साथीदार यांच्यासह सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितले.

अशा प्रकारे वारजे पोलीस ठाणे, गुरनं १५/२०२२, भादवि ३०७,५०४,५०६,३४ आर्म ॲक्ट ४(२५),मोक्का ३(१)(२),३(२),३(४) या गुन्हयातील पाहिजे आरोपी सिद्राम उर्फ अभी रमेश मंजिली, वय २४ वर्षे,रा.डहाणूकर कॉलनी,कोथरूड,पुणे यास ताब्यात घेवून पुढील तपासकामी वारजे माळवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, श्री.प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त १,गुन्हे श्री.सुनिल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली व खंडणी विरोधी पथक १,गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील यांच्या सुचनेप्रमाणे पोलीस उप निरीक्षक यशवंत ओंबासे, पोलीस अंमलदार राजेंद्र लांडगे,अमोल आवाड, सयाजी चव्हाण,अमर पवार व प्रविण ढमाळ यांनी केली आहे.